# १३ व्या शतकातील लेखक-मनाने स्वीकारलेल्या जाणिवांचे स्वरुप

तेराव्या शतकामध्ये मराठी भाषेत लेखन करु पाहणा-या लेखक-मनाचे प्रकृतीधर्म शोधणे अगत्याचे ठरते. तेराव्या शतकातील लेखकमन हे सुसंस्कृत होते, प्रतिभावंत होते, पुष्कळसे श्रध्दाळू होते. हे लेखकमन स्वभावतः सात्विकतेकडे ओढ असलेले होते. साधेपणा, उच्च विचारसरणी, वैराग्य, संतत्व, अध्यात्म, तत्वज्ञान आदीविषयी हया लेखकमनाला एक स्वाभाविक आकर्षण होते. हे मन सहिष्णू होते. समन्वयी वृत्तीचे होते. एकांगीपणाचे त्याला वावडे होते. लोकसंग्रहाची आवड बाळगून होते. ऐहिकाविषयी ते उदासीन नव्हते. ऐहिक आणि आध्यात्मिक यांची सांगड घालून ऐहिक जीवनाला आदर्शाप्रत नेण्याची अभिलाषा धरुन होते. हे मन कणखर वृत्तीचे होते. अन्यायाला शरण जाणारे नव्हते. ढोंग, मिथ्याचार दंभ हयांचा अधिक्षेप करु शकणारे कठोरपणही त्यात होते. शृंगार, वीर, करुण, हास्य आदी नवरसांशी सलगी करु शकणारी रसिकता त्यात होती. पूर्वकालीन लेखनादर्शाचे अनुकरण करताना स्वतःचे वेगळेपण जपण्याची अस्मिताही त्यात होती. संस्कार ग्रहणाच्या प्रकियेतून ते लेखकमन पुष्ट बनू पहात होते. संस्कृत प्राकृत भाषेतील श्रेष्ठ वाङ्‌मय कृतीतून संस्कार घेत असताना स्वतःचे मराठीपण जपण्याची स्वत्व-बुध्दी त्यात होती.

## लेखक मनाने स्वीकारलेल्या जाणिवांचे स्वरुपः-

तेराव्या शतकातील लेखकमनाने ज्या संकेतांचा स्वीकार केला, ज्या संस्कारांचे अनुकरण केले त्यांचे निरीक्षण करताना काही महत्वाच्या जाणिवा लक्षात येतात.[१]

१. मराठी वाङ्‌मयात ग्रंथलेखनाची सुरुवात पूर्व वाङ्‌मयकृती आणि लेखक-कवी हयांना देवतांच्या रुपात पाहून त्यांच्या वंदनाने करतात.

२. वेदांपासून चालत आलेल्या वाङ्‌मय परंपरेविषयी त्याचप्रमाणे व्यासादिकांविषयी मराठी लेखक-कवी आदरभावना व्यक्त करतात.

३. वैदिक वाङ्‌मय, ब्राम्हणे, उपनिषदे, पुराणे, महाभारत, रामायण, भगवद्‌गीता, भागवत, दर्शन-ग्रंथ, अवैदिक दर्शने आदी ग्रंथातून व्यक्त झालेल्या धर्मविचारावर भाषा लिहिताना व धर्मविषयक वैचारिक भूमिका सिध्द करताना मराठी-लेखक-कवींनी नव्या काळात दिलासा देणारी, मार्गदर्शक ठरणारी व आचरणाला सोपी अशी भक्तितत्वावर आधारलेली व्यापक तत्वज्ञानाची भूमिका मांडली. पारंपारिक धर्मकल्पनेची चौकट न मोडता त्यांनी हे केले. जिथे विरोध अपरिहार्य होता तिथे त्यांनी सामाजिक छळ, राजकीय सत्तेचा विरोध सहन करुन विरोधी भूमिका मांडल्या.

४. संस्कृतमध्ये बंदिस्त असलेले अध्यात्मिक ज्ञान, धर्मविषयक कल्पना सामान्य लोकांना समजण्यासाठी मराठी भाषेतून लिहिण्यास सुरुवात केली.

५. त्यांनी भाषापध्दतीमध्येही बदल केला. तर्कपध्दतीची भाषा सोडून देऊन स्पष्टीकरणावर भर देणारी, श्रोत्यांचे अवधान टिकवून ठेवणारी कारुण्यभावनेने भारलेली, मूळ विवेचनाचा विस्तार करणारी, केवळ खंडनमंडनावर भर न देता स्वतःच्या विचारांचा प्रसन्नपणे परिपोष करणारी भाष्यपध्दती रुढ केली. विचारांच्या स्पष्टतेवर भर असे शुष्क तत्वचर्चेपेक्षा भावार्थाला महत्व होते. अरुपाला रुपदेण्याचे सामर्थ्य प्रतिभाशक्तीत होते. त्यांच्याजवळ मराठी भाषेतून लेखन करण्याचा अभिमान होता. अर्थवत्तेच्या बाबतीत संस्कृताशी पैजा जिंकण्याची ईर्षा ते व्यक्त करीत.

६. तेराव्या शतकाच्या सुमारास महाराष्ट्रात नाथ, दत्त, महानुभाव, वारकरी इत्यादी संप्रदाय आस्तित्वात आले होते. सर्व संप्रदायांचे उदिद्ष्ट समान होते. त्यांची मार्गदर्शक तत्वे पुष्कळशी समान होती. अध्यात्माची आवड निर्माण करणे. दारिद्रय, उपासमार, दुष्काळ, परकीय आक्रमण, धार्मिक छळ इत्यादी संकटांना धैर्याने तोंड देण्याचे आत्मिक बळ समाजात निर्माण करणे, ऐहिकापेक्षा पारमार्थिक सुखाची शाश्वतता समाजाला पटविणे ही त्यांची उदिद्ष्टे होती.

हे कार्य प्रत्यक्ष उपदेशांतून, कीर्तनांतून, लेखनातून व आचरणाच्या आदर्शातून केले जात होते. तेराव्या शतकातील धार्मिक जीवनाचे वैशिष्ट्य असे की तेव्हा

वैदिक धर्म हा विशुध्द आचार, तात्विक अधिष्ठान, विशाल सहानुभूत अंत:करण परिवर्तनशीलता यांचे बाबतीत कमकुवत झालेला होता आणि वैदिक धर्मातील व्यापक तत्वांचा आधार होऊन, लोकसंग्रहवृत्तीने भारलेले विविध संप्रदाय महाराष्ट्रात कार्यरत झाले होते या संप्रदायातील संतांनी प्राचीन मराठीच्या आरंभकाळात लेखन करण्यास प्रारंभ केला.

संतांचे वाड्:मय वरील पार्श्वभूमीतून लिहिले गेले, त्यांच्या सदाचाराने पवित्र असणा-या जीवनाकडे आदर्श म्हणून पाहण्यात येऊ लागले . शिवाय संत जे अनुभवीत तेच लिहीत . तसेच त्यातील पुष्कळसे संत साधकांच्या भूमिकेवरुन लिहीत. जे सिध्द होते त्यांच्या मनात साधकांविषयी विलक्षण आस्था होती. आर्त होते, आर्जव होते, अनुभवाच्या, प्रचितीच्या अधारावर हे वाड्:मय उभे होते.

**पूर्व संस्कारांचे महत्व व स्वरुप:-**

कोणत्याही भाषेच्या आरंभकाळातील वाड्:मय पूर्वकालीन भाषांतील आदर्शरुप मानलेल्या वाड्:मयकृतीतून स्वत:च्या रुपसिध्दीकरता काही संस्कार मिळवीत असतात. यामध्ये काही वैशिष्ठयांचे अनुकरण असते तर काही महत्वाच्या आंतरिक जाणीवांचे अनुकरण असते. कोणतेही वाड्:मय स्वयंभू-एकाएकी सिध्द होत नाही. पूर्वकालीन लेखनादर्शनाचे अनुकरण-संस्करण करीतच प्रगतीपथावर पोहोचते व नव्याच्या सामर्थ्याचा साक्षात्कार घडविते. अनुकरणातून ग्रहण केलेले विरोधी संस्कार कालांतराने गळून पडतात. मुलभूत प्रकृती घडविणारे, मढविणारे संस्कार मात्र त्या वाड्:मयरुपाशी एकजीव होऊन जातात.

विशिष्ट भाषेतील विशिष्ट वाड्:मय सिध्द होताना त्या वाड्:मयावरील ग्रहीत संस्कारांचा विचार जसा करावा लागतो तसा त्या भाषेत लेखन करणा-या लेखकमनाच्या प्रकृतिधर्माचा विचारही करणे कमप्राप्त असते. विशिष्ट भाषामधील नव्याने लेखन करु पाहणा-या लेखकमनाचे काही मूळ मनोधर्म असतात. हे ज्या पूर्वकालीन भाषेतील लेखकमनाच्या मनोधर्माशी जुळतात अशा दोन भषिक वाड्:मय रुपांमध्ये अनुकरण व देवाणघेवाण शक्य होते. समान धर्मियत्वामध्येच अनुकरण प्रकिया शक्य होते. आदर्शरुप, अनुकरणशील भाषेमध्ये समृध्दता असावी

लागते.

तेराव्या शतकातील लेखकमन हे सुसंस्कृत प्रतिभावंत, श्रध्दाळू होते. स्व-सामर्थ्याविषयी सार्थ आत्मविश्वास होता. पूर्वकालीन संस्कृत, प्राकृत भाषांतील आदर्श मानल्या गेलेल्या वाड्:मय परंपरेविषयी त्याला आस्था होती. हे मन सात्विक, साधे, उच्चविचार सरणीचे होते. वैराग्य, संतत्व, अध्यात्म, तत्वज्ञान इत्यादीविषयी एक स्वाभाविक आकर्षण होते. हे मन सहिष्णू, समन्वयी वृत्तीचे होते. ऐहिकाची व अध्यात्माची सांगड घालून जीवनाला आदर्शाप्रत नेण्याची अभिलाषा होती.

नवरसांशी सलगीची रसिकता तर होतीच पण पूर्वकालीन लेखनादर्शाचे संस्करणातून स्वत्वाच्या वेगळेपणाचा ठसा उमटविण्याचे सामर्थ्यही त्यात होते. अनुकरणाची नम्रता व निवडबुध्दी होती. संस्कार ग्रहणाच्या प्रक्रियेतून लेखकमन पुष्ट बनू पहात होते. पूर्वकालीन भाषेचे मिंधे राहिले नाही. संस्कृत, प्राकृत भाषेतील श्रेष्ठ वाड्:मयानुकरण - संस्करणातून स्वत:चे मराठीपण जपण्याची स्वत्व-बुध्दि वाढीस लावली.

## १३ व्या शतकातील मराठी ग्रंथकारांसमोर असणारे लेखनादर्श

१३ व्या शतकातील ग्रंथकारांसमोर प्रामुख्याने वैदिक वाड्:मय आदर्श म्हणून असले पाहिजे. वैदिक ग्रंथांचे वाचन, अध्ययन, पठण, श्रवण, मनन या ग्रंथकारांकडून होत असले पाहिजे. संस्कृत व प्राकृत भाषेमधील महाकाव्ये, चरित्रकाव्ये, नाटके रसिकतेने वाचली जात असावीत. प्राकृत व अपभ्रंश भाषेतील वाड्:मयाशी परिचय असावा.[२]

प्राचीन चरित्रात्मक लेखनाशी संबंध असलेली महत्वाची जाणीव वैदिक वाड्:मयात दिसते. नैसर्गिक शकतींना दैवतरुप देण्याची कल्पकता, वेदांच्या ऋचा, प्रार्थना, स्तोत्रे यांच्या रचनातून आढळते. दैवतरुपांना मानुषी आकार देण्याची प्रथा होती. तो एक प्रतिभेचा अंगभूत गुण होता.

दैवतांच्या लेखनातून, प्रार्थनातून, त्यांचे रुप, सामर्थ्य, गुणांची स्तुती, तिच्याकडूनच्या अपेक्षा हयांचे वर्णन दिसते. अमूर्त दिव्यत्वाचे मूर्त, अरुपाचे रुप

करण्याची कल्पना चरित्रात्मक लेखनाशी मिळती जुळती आहे. वाङ्:मयाध्ययनातून मराठी लेखक–मनाने खालील जाणिवा अनुसरल्या:-

१.मानवी मनाचे दिव्यतेविषयी वा अद्‌भुततेविषयी आकर्षण

२.अमूर्त शक्तींना मूर्त-सगुण मानवी आकार शोधणारी कल्पनाशक्ती मानवी मनाला आकर्षित व कल्याणप्रदवाटे.

३.दिव्य-आदर्श गुणांमध्ये देवत्व पाहण्याची वृत्ती

४.दिव्य गुणांची मूर्ती, देवत्वाला मानवी स्वभावगुणांचे आवरण चढवून त्या गुणांची पूजा करण्याची इच्छा.

वरील जाणिवांनी युक्त असे श्रीकृष्ण, रामचंद्र, हनुमान, शंकर, विठ्ठल, दत्तात्रय इत्यादी देवतांच्या कथांवर आधारलेले वाङ्:मय १३ व्या शतकात आढळते. पौराणिक व्यक्तिरुपांच्या कथा चरित्रपध्दतीने लिहिलेल्या आढळतात.

<u>**विविध संस्कार:-**</u>

<u>**वैदिक वाङ्:मयातून मिळविलेले संस्कार**</u> आशयाच्या दृष्टीने वैदिक ऋचांचे दोन भाग पडतात:-

१) धर्मविषयक कल्पना स्पष्ट करणारे

२) नितीविषयक कल्पना व्यक्त करणारे [३]

प्रत्येक देवता कोणत्यातरी गुणांचे, शक्तीचे प्रतीक मानले जाई. उदाहरणार्थ- इंद्र- पराकमाचे, वैभवाचे प्रतीक तर अग्नी हा पवित्र्य, सात्विकता यांचे प्रतीक मानले जाई. १३ व्या शतकामध्ये परमेश्वर प्राप्तीचे ध्यास तीव्रतर वाढल्याने संतमहंतांमधील अलौकिक सामर्थ्याविषयीचे कुतूहल समाजमनात गाढ बनत गेले. दानस्तुतीच्या ऋचांमध्ये दात्याबद्दल स्तुतिपर लेखन करण्यात येई. हया ऋचा संवादात्मक असत. दानस्तुतीचे मराठी रुप श्रियाळ, दधीची, सुदाम, दामाजी हयांच्या चरित्रकथांमधूनच दिसते.

<u>**अद्‌भूताविषयीचे सनातन कुतूहल:-**</u>

मंत्रतंत्र, जादू, चमत्कार यांच्या कथा <u>आढळतात.</u> संत चरित्रांमध्ये कशात?

अद्‌भूताविषयीचे सनातन कुतूहल सापडते. धर्म वाङ्:मय प्राथमिक स्वरुपात

असल्याने त्यात स्वाभाविक आकांक्षा अविष्कारपध्दती प्रतिबिंबित झाल्या आहेत. दीर्घायुषी, गोधनप्राप्ती, पुत्रप्राप्ती या इच्छात्यातून व्यक्त होतात.

देवत्वाविषयीच्या कल्पनांचे रंग, रुप. बदललेले दिसतात. वेदकाळातील देवता पुराणकाळात नाहीत. देवत्वाकडून किंवा अतिमानुषीत्वाकडून मानुषीकरणाकडे प्रवास आढळतो. राम, कृष्ण, शंकर, हनुमान, विठ्ठल हयांच्या व्यक्तिमत्वाचे रंग मानवी व्यक्तिमत्वाशी जुळणारे आहेत.

वेद वाड्:मयातील चमत्कार कथांचे कल्पनाबंध मराठी चरित्रात्मक लेखनात अनुसरले आहेत. संत चरित्रामध्ये या बंधांचे श्रेय ईश्वरी शक्तीला देण्यात येते. सामान्य वाचक श्रध्देने या कथा वाचीत असल्याने त्या कथा संतव्यक्तीच्या मोठेपणाचे लक्षण मानतो.

सारांश, वैदिक वाड्:मयाने मराठीतील प्राचीन वाड्:मय कृतींचे स्वरुप घडविण्यात संस्कारांच्या स्वरुपात मोठा वाटा उचलेला आहे.

१३ व्या शतकात प्रचलित असणा-या अवतार कल्पनेचे बीजही वैदिक ऋचांमध्ये शोधता येते. विराट देहाचा त्याग करुन ईश्वरी चैतन्य अंशरुपात कसे व्यापून राहते, याचे वर्णन गायत्री मंत्रात येते. अवतार कल्पनेचा विकास पुराण वाड्:मयात झाला. विभूतिमत्वाला किंवा अवतारित्वाला चरित्रात्मक लेखनात पुष्कळच अवकाश मिळालेला आहे. स्वत:च्या लेखनाचे कर्तृत्व पुष्कळशा कवि-लेखकांनी ईश्वरी प्रेरणेला बहाल केलेले दिसून येते. वेदातील श्रुती, स्मृतींची परिभाषा महानुभावांनी उपयोजिली आहेच.

वैदिक ऋचांचे स्वरुप मुख्यत: इच्छित साध्यांसाठी परमेश्वरी शक्तीची उपासना, स्तुती, प्रार्थना यांच्या पध्दतीचे आहे. इष्ट देवतेचे प्रसंगाविशेषी स्तवन करणे, तिचे मूर्तिवर्णन करण, मनातील भावना तीव्रतेने वर्णन करणे इत्यादी निवेदन पध्दती प्राचीन मराठी चरित्रात्मक लेखनाने अनुसरलेल्या आहेत.प्रश्नोत्तर स्वरुपाचे निवेदन, संवाद स्वरुपाचे निवेदन, स्तुतीपर प्रकरणे इत्यादी निवेदन पध्दती वेद अनुसरुन त्यातून स्वत:ची रुपसिध्दी मिळविण्यात तेराव्या शतकातील लेखक कवींनी हयगय केलेली नाही. वैदिक वाड्:मयाचा विकास ब्राम्हणग्रंथ, उपनिषदे,

आरण्यके, वेदांची सहा अंगे हयातून झाला. आरंभीचा आध्यात्मविचार सुक्ष्म व कूट स्वरुपाचा बनत गेला. हे लेखन सुत्रबध्द झाले. शिक्षा, कल्प, छंद, निरुक्त, व्याकरण आणि ज्योतिष हया अंगांनी मूळ विचारांमध्ये समृध्दता प्राप्त झाली. हया कूट विचाराच्या स्पष्टीकरणार्थ आख्याने, काव्ये, नाटके, पुराणे, इतिहास, या स्वरुपात कथात्मक साहित्य उत्तरवैदिक काळात निर्माण होत राहिले. त्याची परिणती महाकाव्याच्या निर्मितीत झाली.

**महाकाव्यांपासून मिळविलेले संस्कार:-**

भारतीय जीवनाच्या विविध अंगांची साक्षेपी वर्णने महाकाव्यातून केलेली आहेत. सर्व संग्राहकता हा महाकाव्यांचा रचनेचा विशेष म्हणता येईल. रामायण महाभारतातील कथांचा, त्यातील व्यक्तींच्या आदर्श रुपांचा परिणाम उत्तरकालीन भाषांतील साहित्यावर ठळकपणे दिसून येतो. मानवी जीवनाशी संबंधित असलेल्या सर्व ज्ञान-शाखांचे ज्ञान हया महाकाव्यांमध्ये संग्रहीत करण्यात आलेले आहे. ही सर्व संग्रहकता मराठी लेखकांनी पुष्कळशा प्रमाणात अनुसरली आहे. महाभारतात असंख्य व्यक्तीचरित्रे सामावलेली आहेत. चरित्र, नाटक, काव्य कथा हया वाङ्‌मयरुपांच्या सीमारेषा महाभारतात एकमेकींशी मिसळून गेल्या आहेत. पराक्रम, औदार्य, धर्मनिष्ठा, प्रतिव्रत्य, गुरुशिष्य संबंध हयांचे आदर्श म्हणून मराठी चरित्रकारांसमोर महाभारतातील व्यक्तिरुपे असत. तत्वज्ञानातील कल्पनांच्या पुरस्काराकरिता व्यक्तिचरित्रांचे आदर्श चितारणे आणि अशा चरित्रांच्या आधारे तत्वज्ञानातील अमूर्त कल्पना स्पष्ट करु पाहणे ही पध्दती महाभारतापासून स्वीकारलेल्या संस्कारांचेच निदर्शक आहे.

असेच संस्कार रामायणामुळेही घडले व्यक्तिजीवनाच्या विविध भूमिकांची आदर्शरुपे रामायणांच्या कथेमध्ये चितारलेली आहेत. पितृप्रेम, मातृप्रेम, बंधुप्रेम, राजा व प्रजासंबंध आदींचे आदर्शरुप रामायणातून लक्षात येते. महाकाव्याच्या लेखनसंकेताचेही अनुकरण प्राचीन मराठी चरित्रात्मक लेखनात आढळते. जन्मापूर्वी भविष्यकथन, अवतारित्वाविषयीचे निवेदन, ऋषिमुनींचे आशिर्वाद तीर्थस्थलांच्या महात्म्यकथा अशा स्वरुपांचे निवेदन वा कथनपध्दतीचे संकेत मराठी लेखकांनी

महाकाव्यातून अनुसरले असण्याची शक्यता आहे.

**<u>पुराणवाङ्:मयातून स्वीकारलेले संस्कार:-</u>**

पुराणवाङ्:मय हेही प्राचीन चरित्रात्मक लेखनाच्या प्रसिध्दीला कारणीभूत असलेले वाङ्:मय होय. दशावतारी कथा, हरिवंश, भागवत व अन्य पुराणांतील आख्यांनांचे अनुवाद मराठी कवींनी वारंवार केल्याचे आढळते. धार्मिक दृष्टीने पुराणे ही वेदांइतकीच प्रमाण मानलेली आहेत. मूलतः पुराणांचे लेखन व्यक्तींचे पराक्रम, प्राचीन ऋषीमुनींचे वंश, प्राचीन राजवंश, यांची ऐतिहासिक स्वरूपाची माहिती जतन करण्याच्या हेतूने झालेले आहे. या प्रकारचे लेखन फार मोठया कालखंडावर पसरलेले असल्यामुळे त्यात सर्वसमावेशक वृत्तीने सृष्टीची उत्पत्ती, पंचमहाभूतांचे वर्णन, मानव वंश, देवादिकांच्या कथा, कुलपरंपरा इत्यादी विषय समाविष्ट करण्यात आले. पुराणांतील व्यक्तिचरित्र सांगण्याच्या पध्दतीचा अनुक्रम जन्म, बालपण, शिक्षण, विवाह, पराक्रम, प्रौढता, मृत्यू असा चरित्रसदृश्यच आहे. पुराणांची नावे व्यक्तींचीच आहेत. पुराणवाङ्:मयात व्यक्तिचरित्राप्रमाणेच, दानस्तुती, वंशानुकीर्तन, क्षेत्रवर्णन क्षेत्रमाहात्म्य विविध ज्ञानशाखांतील माहिती, राजनीती, युध्दनीती हयांवरील भाष्ये आदींचाही समावेश आढळतो. प्राचीन मराठी चरित्रकारांनी पुराणांतून उपलब्ध झालेल्या माहितीचा चरित्र लेखनात सामग्री म्हणून सढळ हाताने उपयोग केला. अवतार कल्पनेचाही पुरस्कार करुन त्यांनी चरित्रविषय झालेल्या व्यक्तींना अवतारित्व दिले. जन्मकथा सांगताना पौराणिक कल्पनाबंधांचा उपयोग केला. आकाशवाणी, भविष्यकथन, स्वप्नदृष्टांन्त वरदान अनुष्ठानांचे फळसूचन इत्यादी निवेदन पध्दतींचे अनुकरण त्यांनी केल्याचे आढळून येते. दैवतकथा आणि मानवी जीवनाची कथा, यांचे मिश्रण त्यांनी चरित्रात्मक लेखनात घडवून आणले. उपास्य देवतेच्या ठिकाणी त्यांनी मानवी स्वभावगुण कल्पिले. तिच्या शक्तीमुळे, वरदानामुळे घडून आलेल्या चमत्कार कथांचे बंध त्यांनी चरित्रात्मक लेखनात योजीले. संस्कृतमध्ये चरित्रकाव्ये होती. त्याची अतिप्राचीन पंरपरा होती. मराठी कवींनी त्या धरतीवर काव्यरचना केल्या. मूर्तिप्रकाश, ऋध्दिपूरवर्णन, प्रतिष्ठानवर्णन, सौहार्दवर्णन, भानुविजय ही महानुभावांची चरित्रकाव्ये

होत. चरित्रकाव्ये प्रामुख्याने स्तुतिपर होती.

## प्राचीन धर्मविषयक तत्वज्ञानाचे स्वरुप

### वैदिक तत्वज्ञानाचे स्वरुप:-

प्राचीन धर्मविषयक तत्वज्ञान सर्वसमावेशक व समन्वयी असल्यामुळे सगुण निर्गुण, व्यक्तिनिष्ठ व विश्वात्मक, प्रत्यक्ष व आदर्श हया सारखी व्दंव्दे त्यात सामावलेली दिसतात. वेदान्तात 'आत्मा' हे अविनाशी तत्व मानलेले असून, शरीर हे त्या मानाने गौण मानलेले आहे. आत्मा हाच परमेश्वराचा अंश मानला आहे. स्वत्वाची जाणीव देहरुप न मानता आत्मरुप मानली आहे. शरीर हे केवळ धारक आहे. साहजिकच देहाच्या अनासक्तीची चित्रणे वाड्:मयातून केली जातात. आत्मतत्वाची जाणीवही ज्ञानरुप नसून, तिचा अनुभव महत्वाचा मानला आहे. या जाणिवेच्या पुर्ण अवस्थेत अव्दैताचा श्रेष्ठ अनुभव येतो. कर्मविचार व अंतकरण शुध्दतेस महत्व दिले आहे. सर्व 'कर्म' ब्रम्हसमर्पण करावे. परमेश्वरासाठीच करावे, कर्म शुध्द भावनेने केलेले आणि सेवारुप असले म्हणजे ते यज्ञरुपच आहे. अशी धारणा दिसून येते. कर्मरुप जाणीव सात्वीक राजस व तामस अशी त्रिगुणात्मक मानली असून, सात्वीकाची प्रशस्ती केलेली आहे. हया कल्पनामुळे चरित्रविषय होणा-या व्यक्तीच्या चरित्रातील घटना कृती व उक्ती हयांच्या निवेदनावर बंधने आलेली दिसतात.

'ईश्वर' या कल्पनेलाही धर्मविषयक विचारात महत्व आहे. ईश्वरी प्रेरणा शाश्वत सर्वव्यापी आणि स्वतंत्र अशी मानली आहे. हया तत्वाभोवती हिंदू धर्माचे तत्वज्ञान गुंफले आहे. याचा अनुभव महत्वाचा, ईश्वर तत्वाचा अनुभव विभूतीमत्वाच्या ठिकाणी येतोच हया दृष्टीने चरित्रात्मक लेखनाशी 'ईश्वर' हया कल्पनेचा संबंध येतो. व्यक्ति मनातील निदिध्यास ईश्वर तत्वाचा शोध घेण्यात भारलेले दिसते. हे ध्यास चरित्रविषय झालेल्या संतांच्या अभंग वाड्:मयातून वर्णन केलेले असल्यामुळे त्यांना खरेपणाचे सामर्थ्य प्राप्त झालेले आहे.

हिंदू धर्माच्या तत्वज्ञानात अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. हे अभ्यासावरुन लक्षात येते. वैदिक काळात हा धर्मविचार चैतन्यपूर्ण, विकासक्षम होता. हा

दृष्टीकोन प्रवृत्तीपर होता. रामायण काळात हाच विचार सद्‌गुणांचे पूजन करणारा होता. सद्‌गुणांच्या आदर्श प्रतिमा व्यक्ती चित्रणात आढळतात. महाभारत काळात समाज सापेक्ष होता तर गीतेमध्ये कार्याकार्य विवेकाचे शास्त्रीय विवेचन येते.

उपनिषदकाळात मात्र निवृत्तीपर विचारांना प्रारंभ झाला परमार्थावर भर देणारे तत्वज्ञान होते. जग हे दुःखमय, क्षणिक आहे, असार आहे - मिथ्या आहे अशी धारणा निर्माण होऊ लागली. संन्यासाला महत्व आले. शून्यवादाचे तत्वज्ञान प्रतिष्ठा पावू लागले. पारलौकिक सुख कल्पनेला महत्व येऊन ऐहिक जीवनाचे महत्व कमी झाले.

'संन्यास' घेतलेल्या मनुष्यालाच निर्वाणपद मिळते. संन्यास शक्य नसणारांनी अहिंसा, सत्य, अस्तेय हयांचे पालन करावे दानधर्म करावा. बुध्द व त्याचा धर्म-संघ यांना शरण जावे. मगच चित्तशुध्दी होईल हे उपदेशाचे सार होते. हा उपदेश कोणाला पुसून काढता आला नाही. शंकराचार्यांनी बौध्दधर्माच्या तत्वज्ञानाला हिंदू धर्माच्या तत्वज्ञानामध्ये सामावून घेण्याचा प्रयत्न केला. ज्ञानप्राप्ती, संन्यास, चित्तशुध्दी आणि वर्णाश्रम विहित कर्मे यांची सांगड घातली. गृहस्थाश्रम गौण मानण्यात आला.

वर्णाश्रम धर्मव्यवस्थेत ब्रम्हचर्याश्रम व गृहस्थाश्रम या दोन आश्रमांचे महत्व जाणून संन्यास ही ज्ञानोत्तर सहजास्थिती म्हणून मानली आहे. हया काळात संतांनी लोकांच्या दुःखाचा वेध घेऊन सामूहिक कारुण्याच्या भूमिकेवरुन उपदेश करण्यास सुरुवात केली. वैयक्तिक चारित्र्यसंपन्नतेवर त्यांनी भर दिला. भक्ती मार्गाची कास धरली. भक्तकथा, पौराणिक आख्याने श्रीकृष्ण राम, भक्त प्रल्हाद, आदींची भक्तीभावाने लिहिलेली चरित्रे आळविण्यास सुरुवात झाली. सगुणभक्तीचा पुरस्कार झाला. प्रसारासाठी कीर्तनसंस्थेचे पुनरुज्जीवन झाले. प्राचीन मराठी चरित्रात्मक लेखन वरील स्वरुपाच्या पार्श्वभूमीवर लिहिले गेले.

**अवतारकल्पना:-**

प्राचीन मराठी लेखक मनावर अवतारकल्पनेचा पगडा विशेष दिसतो. परमात्मा जेव्हा एखादया प्राण्याचे अथवा माणसाचे शरीर धारण करुन काही

काळ किंवा जीवनभर त्या शरीरात वास्तव्य करतो तेव्हा त्या शरीर धारणेला अवतार म्हणतात. सृष्टीमध्ये अनाचार, उपद्रव, संकटे निर्माण होतात, विनाश वाढू लागतो, धर्माची घडी विस्कटते, तेव्हा परमेश्वर अवतार धारण करतो. अशी भारतीय मनाची कल्पना आहे. सर्वच संप्रदायात अवतार कल्पना कोणत्याना कोणत्या स्वरुपात आढळते. पुराणातून विष्णूच्या अवतारांच्या कथा आलेल्या आहेत. अवतार कल्पना ही परमेश्वराच्या स्वेच्छेने घडणारी गोष्ट आहे. तसेच मूळ प्रकृतीवर स्वामीत्व ठेवून घडणारी गोष्ट आहे. ही कल्पना प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. अवतारीत्वामुळे चरित्रनायकांना अतिमानुषी आकार लाभले आहेत. त्यांच्या ठिकाणच्या गुणांचे व सामर्थ्याचे समर्थन झाले आहे. व्यक्तिच्या ठिकाणी असलेल्या वा नसलेल्या दैवी सामर्थ्याविषयी कुतूहल वाढविण्यास ही अवतार कल्पना कारण दिसते.

समारोप:-

थोडक्यात १३ व्या शतकात अनेक संत श्रेष्ठांमध्ये निवृत्तीनाथ, नामदेव, भागवत, गोरा कुंभार, त्यांचे गुरु विसोबा खेचर यांची अभंगवाणी प्रसिध्द आहे. वैष्णवांच्या मेळयांचा आनंद प्रत्येकांने त्यात भर टाकून मनसोक्त भोगला. या वैष्णवात पुरुष स्त्रिया ब्राम्हणेतर व अस्पृश्यही आहेत. ज्ञानी आहेत. केवळ भक्तीने मान्य झालेले साधे भोळेही आहेत. पण सर्वजण जातीकुलांदिकांच्या अभिमानापलीकडे गेलेले आहेत.

परमात्म सुख व परस्पर प्रेमापुढे त्यांना इतर कसलीही आठवण नसे. सर्वांनी परस्परांचे अत्युत्कट प्रेमपडिभाराने गौरव करावे व गुण गौरवात डोलावे. सुखानंद दयावा आणि घ्यावा असा त्यांचा हृदयाशय शुध्द होता. हेवा, दावा, द्वेष आज प्रकर्षाने दिसणारे गुण त्या काळात जाणवत नाहीत.

हे सर्व संत संसारी होते व हरीला सर्वस्व वाहील्याने त्यांनी संसारच ब्रह्मरुप करुन टाकला होता. महानुभावी यांची भिक्षावृत्ती आणि संन्यास यांना मान्य नव्हता. संसारकृत्यदक्ष राहून परमार्थ साधना केली. हाताने काम - मुखाने नाम हा परमार्थाचा मूळमंत्र त्यांनी तंतोतंत अमलात आणलेला दिसतो. जातीकुळ

स्वभावे आलेले संसारकृत्य आनंदाने करीत. "कांदा मुळा भाजी ।अवघी विठाबाई माझी।[४]" याप्रमाणे सावतामाळी आपल्या मळयातले काम करीतच गुणगुणत जनाबाई गोव-या थापीत. चोखामेळा मोलमजुरी करीत. सेना न्हावी, नरहरी सोनार इत्यादी सर्वजण आपले धंदे सांभाळून असत. ते आपल्या पोरांचा भार दुस-यावर घालीत नसत. सर्वांचे अन्योन्य प्रेम इतके की कोणीही कोणाचेही अभंग उतरुन घेत. निवृत्तीनाथांचे अभंग सोपान काका उतरुन घेत. ज्ञानेश्वरांचे लेखक सच्चिदानंद बाबा होते हे प्रसिध्दच आहे. मुक्ताबाईचे अभंग स्वतः ज्ञानेश्वर लिहित. जोगा व परमांनंदांची कविता विसोबा खेचर लिहित. जातीभेदाचा बागुलबोवा कोणालाही भेडसावीत नसे. गुणगौरवाचा आनंद सर्वांच्याच उदार हृदयात सारखाच भरलेला असे.

भेदभाव शून्य एका श्रीहरीच्या परमानंद सुखात सर्व डोलत असत.

**अ)१३ व्या शतकातील सामाजिक परिस्थितीची पार्श्वभूमी**

दहाव्या शतकापासून उत्तर हिंदुस्थानावर मुसलमानांच्या स्वा-यांचे परिणाम फार अनिष्ठ रितीने होवू लागले. मुसलमानी आक्रमणाचा कटाक्ष हिंदूंच्या धर्म संस्थांवर विशेष होता. तक्षशिला, नालंदा, वलभी, विक्रमशिला ही विदयापिठे मुसलमानी आक्रमणामुळे नष्ट झाली. देवालये तिर्थस्थाने ही संस्कृतिक व धर्मविषयक ज्ञानाची केंद्रे होती. येथे संस्कृत पाठ, वेद पठण, शास्त्रांचे अध्ययन चाले. समाजाच्या धर्म बुध्दीवर व राजाकडून मिळणा-या अग्रहावर त्या संस्था चालत.

"मुसलमानी आक्रमणाचे परिणाम धार्मिक, सामाजिक व संस्कृतिक व्यवस्थेवर फार मोठया प्रमाणात झाले. मुसलमानी आक्रमणाच्या लाटेमध्ये देवगिरीची सत्ता खिळखिळी झाली. पैठणचे शिक्षण विषयक महत्व उद्ध्वस्त झाले. ग्रंथांचा नाश झाला. देवालयातील मुर्ती फोडल्या गेल्या. छोटी मुसलमानी राज्ये निर्माण झाली. मुसलमान राजाच्या पदरी ब्राम्हणांनी सेवाधर्म स्विकारला. थोडक्यात, बौधिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक अवकळा निर्माण झाली. विदयाव्यवस्था संपुष्टात आली कारण देवालयांच्या असुरक्षिततेमुळे समाज अक्षरशः

सगळीकडून गांजला गेला. धर्म जीवन अस्थिर झाले. कीर्तन भक्ती तिर्थयात्रा मंदिरांचे जीर्णोध्दार यांना महत्व आहे. हयाच परिस्थितीत संत चरित्रांनाही मोठे महत्व प्राप्त झाले.

"कीर्तन" या सामाजिक संस्थेव्दारे महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन घडले जात होते. समाजावर संस्कार घडविणा-या धर्मविषयक व नितिविषयक कल्पनांचा प्रसार करण्याचे कीर्तन हे महत्वाचे साधन ठरले. आक्रमणाच्या अस्थिर काळात कीर्तनाचे साधन विशेष प्रभावी ठरले. कीर्तन समाजाश्रयी होते. कीर्तन भक्तीमध्ये परमेश्वराचे गुणगान करणे, कथा सांगणे, चरित्र पठण करणे, नामसंकीर्तन करणे हया गोष्टींचा समावेश होता. समाजाला सन्मार्गाला लावणे, सन्मार्गाचा उपदेश करणे हे एक महत्वपूर्ण कार्य होते. कीर्तनकार कौशल्याने परमार्थाची व लौकिकाची सांगड घालीत असत. कीर्तनांचा साचा ठरलेला दिसतो. पुर्वरंग आणि उत्तररंग अशा मांडणीने कीर्तनाला एक अपूर्व थाट येई. आरंभी देवतावंदन, एखादे तत्व प्रतिप्रादन, भजन, नामसंकीर्तन, गायन, कथानिरुपण इत्यादीमुळे कीर्तन हे लोकरंजनाचे साधन तर ठरलेच शिवाय धर्म विचार प्रवर्तनाचे कार्यही परिणामकारकपणे होवू लागले. संत चरित्रांचे लेखन बव्हंशी कीर्तनासाठीच केले गेले आहे. कीर्तन महात्म्यावरही मराठीत खूप रचना झाली आहे. कीर्तनकारांना मोठी प्रतिष्ठा असे.

**ब) १३ व्या शतकातील राजकीय परिस्थिती:-**

११व्या शतकापासून १४ व्या शतकापर्यत महाराष्ट्रात वेगवेगळया राजवंशांची लहान राज्ये अस्तित्वात होती. ही राज्ये कोणातरी सामर्थ्यवान सम्राटाच्या अंकित असत. ती वेळ प्रसंगी सम्राटाला खंडणी देवून सहाय्य करीत, मात्र प्रत्यक्ष राज्यकारभार हया मांडलिक राजाच्या हातात असल्याने योग्य संधी मिळताच स्वतंत्र बनत. यादवांची साम्राज्यही वरील स्वरुपाचेच होते.[६]

**महाराष्ट्रांतील भक्ती पंताचे कार्य:-**

यादवांच्या अखेरच्या काळात मराठी बोलीला राजभाषेचा सन्मान पाप्त झाला होता. मराठी विषयीच्या आत्मीयतेची जाणीव लेखक कवींच्या मनात नव्याने

निर्माण झालेली दिसते.

नवव्या शतकानंतर महाराष्ट्राला आपली कर्मभूमी मानून धर्मविचारांचा प्रसार करणारे भक्तीपंत महाराष्ट्रात निर्माण झाले. नाथ, महानुभव, वारकरी, दत्त हे संप्रदाय बोलभाषेतून आपापल्या पंथीय तत्वज्ञानाचा पुरस्कार करीत होते. महानुभवांनी मराठीतून चक्रधरांनी निरुपिलेल्या मार्गाचा व उपदेशिलेल्या आचार धर्माचा प्रसार केला. सुत्रे, स्तोत्रे, काव्ये या बाबतीत संस्कृतमधील लेखनादर्शाचेच अनुकरण झाले.

नाथ संप्रदयाची साधना थोडी अवघड असल्याने जन सामान्यांना ती थोडी दुष्कर वाटली असे दिसते. कारण या मध्ये योग साधना, विजनवास निर्गुणांची उपासना, आंतरिक शुध्दी यावर भर होता. गुरु पध्दतीची साधना असल्याने लोकमाणसावर फारसा प्रभाव पडू शकला नाही.

वारकरी संप्रदायामध्ये मात्र भक्तीची सोपी साधने दिसतात. वारकरी संप्रदयाची कार्य पध्दती व तत्वज्ञान साधे, सोपे आणि सुलभ दिसते. साधेपणामुळेच वारकरी संप्रदाय समाजात लोकप्रिय ठरला. वारकरी पंथाने जनसामान्यामध्ये, शास्त्रप्रामाण्याला व जाती व्यवस्थेला धक्का न लावता आत्म विकासाची अस्मिता निर्माण केली. प्रापंचिक दु:खांवर मात करण्यास शिकविले. कथा कीर्तनातून नामसंकीतन, भजने, भारुडे, अख्यानके, संतचरित्रे, वैयक्तिक जीवनादर्शक यांतून त्यांनी समाजाच्या सर्व स्तरांमध्ये आत्मविश्वासपूर्वक अध्यात्मिक उन्नतीचे कार्य केले.

**<u>१३ व्या शतकातील प्राचीन लेखन परंपरा:-</u>**

तेरावे शतक प्राचीन मराठी चरित्रात्मक लेखनांच्या दृष्टीने महत्वाचे मानावे लागेल. याच कालखंडात गदय, पदय, स्वरुपातील वाड्:मय मराठीत लिहिले जावू लागले. याच काळात वैदिक ग्रंथ रामायण, महाभारत, भागवत पुराणे इत्यादीचे श्रध्दापूर्वक अध्ययन झाले. त्यातून मोठी प्रेरणा मिळविली गेली या कालखंडामधील वाड्:मय कृतीमध्ये बरीच वैशिष्ठे दिसून येतात. विचारांचे प्रोढत्व वृत्तीचे गांभीर्य निरुपणाची उत्साह रसात्मकता अर्थघनता, आत्मविश्वास आणि

पृथगात्मता इत्यादी वैशिष्ठेपूर्ण रचना आढळतांत.

आजपर्यंत संस्कृतमध्ये बंदीस्त असलेले वाङ्‌मय जनसामान्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य झाले. ज्ञानेश्वर, मुकुंदराज माहिमभंट्ट इत्यादीच्या ग्रंथातून समाजाच्या सर्व स्तरातील सुजन वृत्तीच्या माणसांना केवळ ग्रंथ वाचनांची गोडी निर्माण झाली असे नव्हे, तर आपल्या भावनांना अभिव्यक्ति शोधण्याची ही प्रेरणा झाली. तेराव्या शतकाचे वैशिष्ठपूर्ण वैशिष्ठ म्हणजे लेखक व श्रोता यांचे परस्पर संबंध, गद्य व पद्यलेखनाच्या प्रदीर्घ परंपरा याच काळात निर्माण झाल्या. तसेच चरित्रात्मक लेखन गद्य व पद्ययामधून होवू लागले. माहिम भट्टांच्या लिलाचरित्राने स्मृतिरुप चरित्राची एक धारा निर्माण झाली. नामदेवांनी ज्ञानेश्वर चरित्राच्या स्वरुपात, अभंगात्मक, चरित्रात्मक लेखनाचे सूतोवाच केले. तसेच संस्कृत चरित्र काव्यांच्या अनुकरणातून लक्षणीय अशी चरित्र काव्याची मराठी रुपे निर्माण झाली.

नाथसंप्रदयातील लेखन प्रवृत्तीचा अभाव व कारणे:-

[७] तेराव्या शतकातील चरित्रात्मक लेखन हे नव्याने उदित झालेल्या संप्रदयांच्या आधाराने निर्माण झाले. विशेषत: महानुभाव व वारकरी संद्रदयात हे लेखन विशेषत्वाने केले गेले. नाथसंप्रदयामधील गोरक्षनाथ, मच्छिंद्रनाथ इत्यादी नाथ योग्यांच्या चमत्कार कथा, दंतकथा, आख्यायिका लोकमानसावर रेंगाळत राहिल्या. परंतू त्यांची लिखित स्वरुपातील चरित्रे लिहिली गेली नाहीत. नंतरच्या काळात मात्र नवनाथांच्या चरित्रमाला लिहिल्या गेल्या.

नाथसंप्रदायात गुरुभक्तीला महत्व असल्याने विजनवासात राहून संन्यस्त वृत्तीने योगसाधना करण्यावर भर दिल्याने चरित्रात्मक लेखनाला उपकारक अशी सामुग्री या पंथीयांना आरंभ काळात उपलब्ध झालेली दिसत नाही. नाथ संप्रदायाचे भयचकित आकर्षण जवळीक निर्माण करण्याइतके घनिष्ठ नव्हते. चांगदेवांचे चरित्रही वारकरी संप्रदयातील चरित्रकराने लिहिले आहे. थोडक्यात नाथ संप्रदयांमध्ये चरित्रात्मक लेखन झालेले दिसत नाही मात्र माहानुभाव आणि वारकरी या दोन संप्रदयामध्ये लेखनाचा विशेष उत्साह दिसून येतो.

**धार्मिक परिस्थितीची प्रतिकूलता:-**

लेखनाच्या प्रेरणा १३ व्या शतकातील समाजाला ग्रंथातील ज्ञान सोपेपणाने व आत्मप्रत्ययाने सांगणारा ग्रंथ हवा होता. १३ व्या शतकातील समाजाची ही गरजच होती. यादवांची सत्ता मोडकळीस आली होती, पराक्रमाचे तेज मंदावले होते. राजकारण व समाजकारण यातील सुस्थिरता संपुष्ठात आली होती. असुरक्षित व्यक्तिगत जीवन, रुढीग्रस्तता, कर्मकांड, दैवंतांचे पुजा प्रकार, सकामभक्ति, ढोंग, दंभ या विविध कारणाने धर्म जीवनातील चैतन्य जवळजवळ लोप पावले होते. अशा परिस्थित ज्ञानेश्वर, नामदेव, चक्रधर याच्या सारख्या विभूतींना समाजाने परमेश्वराचे अवतार मानले यात आश्चर्य नाही.

**१३ व्या शतकातील प्राचीन लेखन परंपरा:-**

१३ व्या शतकात प्रामुख्याने जे लेखन झाले ते बहूत करुन परमेश्वर भक्तीने ओथंबलेले आणि परमेश्वरला आळवण्याच्या हेतूनच लेखन झालेले दिसते.

मराठी वाड्:मयामध्ये संत महात्म्यांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. त्यामुळे त्यांचे आपल्या समाज इतिहासातील स्थाम अलौकिकच आहे. संत नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ व तुकाराम या पाच संत कवींचे कार्य अद्वितीयच आहे. आज शतकानुशतके हया संताची अमृतवाणी महाराष्ट्रीय मनाला संजीवनी देत आली आहे.

संत महंतांनी आपल्या लेखन शैलीचा ठसा आगळावेगळाच उमटवला आहे. नामदेव ज्ञानेश्वर काळी अभंगवृत प्रचारात आले. सर्व संत महंतांनी आपले विचार अभंगातच प्रकट केले आहेत.

ओवी - अभंग वाणी -

ॐ नमोजी जनार्दना । नाही भवाभव भावना ।

न देखोनी मि तू पणा । नमन श्री चरणा श्रीगुरुराया ।

अशा प्रकारे ज्ञानेश्वर व रामदास यांची ओवी आटोपशीर आहे. नाथांची ओवी जरा प्रशस्त आहे. पण वामनपंडीतांच्या ओवीत मात्र अक्षरांचा काहीच घरबंध नाही. अभंगातही काही निर्बंध नाहीत.

तिन चरणी अभंगापासून ते शंभर चरणी दोनशे चरणीसुध्दा अभंग आहेत. हे अभंग ओवीसारखे म्हणता येतोत. ओवी आणि अभंगात थोडा सारखे पणा जाणवतो. अभंगात अक्षरांचा व चरणांचा निर्बंध नाही. ठाकठिकीची रचना तुकोबांची असल्यामुळे व त्यांचे अभंगही लोकप्रिय झाल्यामुळे "अभंगवाणी प्रसिध्द तुकयाची" अशी म्हणच पडून गेली.

ओवी आणि अभंग ही दोन्ही वृत्ते महाराष्ट्राची आवडती आहेत. ती गायला व समजायला सुलभ असल्यामुळे मराठीतील बहूतेक नामांकित वाङ्‌मय याच दोन वृत्तात प्रकट झालेले आहेत.

मराठी भाषेची स्वतंत्र वृत्ते, अभंग, ओवी, साकी, दिंडी, कटाव, पोवाडे इत्यादी होत. परंतू नामदेव ज्ञानेश्वर काळी अभंग वृत्त प्रचारत आले. माहानुभाव लेखनात काठेही अभंग रचना आढळत नाही. मुळ अनुष्टुभ वृत्तातूनच अभंग व ओवी ही वृत्ते निघाली. साधा अभंग ओवीसारखा व ओवी अभंगासारखी म्हणता येते.

ज्ञानेश्वरीची पहिली ओवी घ्या:- ॐ नमोजी आदया । वेद प्रतिपादया ।
स्व:संवेदया । आत्मरुपा ।

ही ओवी साडेतीन चरणाची असून तीन "दया" हया अक्षरांची तिनदा आवृत्ती झाली आहे. हीच ओवी अभंगाच्या धरतीवरही म्हणता येते.

ॐनमोजी आदया वेदप्रति पादया ।
जयजय स्वसंवेदया आत्मरुपा ।॥१॥

हा झाला अभंग पुढे एकनाथांनी ओवी चार चरणांची व चार यमकांची बनवली.

ज्ञानेश्वर, नामदेव, मुक्ताबाई व जनाबाई चोखामेळा यांचे अभंग सर्वोत्कृष्ट व लोकप्रिय आहे. यांच्यानंतर एकनाथ, तुकाराम, रामदास, निळोबाराय यांचे अभंग तसेच लोकप्रिय झाले आहेत. सर्व संतांनी अभंगाच्या व्दारे भागवत धर्माचा प्रसार महाराष्ट्राभर केला व त्या निमित्ताने खेडयापाडयातून व ब्राह्मणापासून ते अंत्यजांपर्यंत सर्वांना मराठी वाङ्‌मयाची गोडी लावली. सर्व जणच या भक्ती रसामृतात विशेषत: वारकरी मंडळी ओत:प्रोत न्हाऊन निघाली.

## संदर्भ टीपा:-


१. स्मृतिस्थळ :- एक विवेचन - डॉ.वसंत रा. बोरगांवकर नूतन प्रकाशन - पूणे ३० पृ. १८ व १९.

२. स्मृतिस्थळ :- एक विवेचन - डॉ.वसंत रा. बोरगांवकर नूतन प्रकाशन - पूणे ३० पृ. ३० व २१.

३. तत्रैव :- पृ.२१

४. संतमेळा व त्यांचे अभंग वाङ्मय - ल.रा. पांगारकर. पृ.४२३

५. स्मृतिस्थळ :- एक विवेचन - डॉ.वसंत रा. बोरगांवकर नूतन प्रकाशन - पूणे ३० पृ. ३३.

६. तत्रैव :- पृ.क. ३४, ३५.

७. तत्रैव :- पृ.क. ३८, ३९.

८. तत्रैव :- पृ.क. ३९, ४०.